# <u>विशेष दिवाणी दावा ३२/२००७ मधील निशाणी २७८ वरील आदेश</u>

## (<u>विक्रमसिंह देशमुख विरुध्द दिलीप शिंदे</u>)

## (**CNR No.MHSN**050014452007)

१. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांनी वादी व वादी साक्षीदार यांचा ज्या प्रतिवादीतर्फे उलटतपास घेण्यात आलेला नाही त्यांच्याविरुध्द उलटतपास बंद असा आदेश पारीत करण्यात यावा यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन की, प्रकरणामध्ये वादी व वादी साक्षीदारांचा यापूर्वी उलटतपास घेण्यात आला. परंतु अनावधानाने काही प्रतिवादी यांनी उलटतपास घेतलेला नाही, तरी त्यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत होणे बाकी आहे. सदर प्रतिवादींविरुध्द उलटतपास नाही असा स्पष्ट आदेश भविष्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता व तांत्रीक अडचण राहु नये याकरीता पारीत करावा.

३. सदर अर्जास प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. त्यापैकी केवळ प्रतिवादी क्र.२,३ व ५ यांनी म्हणणे दिले. करीता उर्वरीत प्रतिवादीविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करण्यात आला.

४. प्रतिवादी क्र.२, ३ व ५ यांनी आक्षेप घेतला की, अर्ज बेकायदेशीर आहे, रद्द होण्यास पात्र आहे आणि वादीने विनंती न करता आदेशात्मक मागणी केलेली आहे.

५. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले. संचिकेचे अवलोकन केले.

६. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.२ व ३ याचा सरतपास नोंदविण्यात आला

आणि त्यानंतर प्रतिवादी क्र.१ आणि ३ यांच्याबाबत आदेश करण्यात आला व प्रतिवादी क्र.५ यांनी घेतलेला उलटतपास नोंदविण्यात आला. परंतु उर्वरीत प्रतिवादींविरुध्द कोणताही आदेश झाल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर वादी साक्षीदार क्र.४ याचा पुरावा नोंदविण्यात आला. परंतु सदर साक्षीदाराच्या पुराव्यापूर्वी कोणीही पूर्वीचे साक्षीदार क्र.२ व ३ करीता उलटतपासासाठी परवानगी मिळावी याबाबत विनंती केलेली नाही. एवढेच नाही तर साक्षीदार क्र.४ च्या उलटतपासासाठी सुध्दा प्रतिवादी क्र.१ चे वारस, प्रतिवादी क्र.२ ते ५, ७ व ९ यांच्यातर्फे कोणतीही विनंती नाही. किंबहुना सदर प्रतिवादी किंवा त्यांचे वकीलही त्यावेळेस गैरहजर होते.

७. या परिस्थितीमध्ये संचिकेचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, साक्षीदार क्र.२ व ३ यांच्या उलटतपासाच्या वेळेस सुध्दा वर नमूद प्रतिवादी क्र.५ व्यतिरिक्त उर्वरीत प्रतिवादी आणि त्यांचे विधीज्ञ गैरहजर होते. त्यांनी परवानगीही मागितलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये जर उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्याचा तांत्रीक दोष शिल्लक राहिला तर त्याचा दाव्याच्या प्रगतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. महत्वाचे म्हणजे तांत्रीक दोष किंवा अनियमितता ही दुरुस्त करता येवू शकते. केवळ बेकायदेशीर बाबींना दुरुस्त करता येत नाही. त्यामुळे सदर तांत्रीक दोष दुर करणे संयुक्तीक आहे.

८. वादीच्या प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने सर्व प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले होते. प्रतिवादी क्र.२, ३ व ५ व्यतिरिक्त इतर प्रतिवादींनी या अर्जावर त्यांना संधी

मिळूनही त्यांचे म्हणणे व आक्षेप स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा वकीलांमार्फत सादर केलेला नाही हे वर्तनसुध्दा विचारात घेणे योग्य आहे.

९. येथे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.६ व ८ यांच्याविरुध्द दावा एकतर्फा चौकशीस लागलेला आहे. त्यामुळे त्यांचे दावा कथन नाही किंवा प्रतिनिधीसुध्दा सुरुवातीपासून हजर नाहीत. ही बाब स्पष्ट करते की, सदर प्रतिवादींना दावा चालविण्याबाबत कोणतीही इच्छा असल्याचे दिसून येत नाही.

१०. या सर्व विवेचना आधारे निष्कर्षास येतो की, प्रतिवादी क्र.२ व ४ , ७ व ९ आणि ६ व ८ यांच्याविरुध्द उलटतपास बंद आदेश पारीत करुन दाव्यातील तांत्रीक दोष व अनियमितता दुरुस्त करणे योग्य आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ व ४, ७ व ९ आणि ६ व ८ यांच्याविरुध्द वादी साक्षीदार क्र.२ निशाणी २४६ व वादी साक्षीदार क्र.३ निशाणी २४९ वर उलटतपास बंद असा आदेश पारीत करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2025.01.24 16:37:16 +0530

इस्लामपूर. (मुकुल म. चितळे)

दिनांक – १८.०१.२०२५ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, इस्लामपूर.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | – | १८.०१.२०२५ |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | २४.०१.२०२५ |